# जालन्यात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा सुपडा साफ

गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ८० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

जवेध्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# बुडाला जळतंय अन् हे डोंगरावरची आग विझवायला पळतंय

## ठाकरेंचे नाव न घेता शिंदेची टिका; जनार्धन मामा चौक येथील मेळाव्यात घोषणाबाजीने दणाणला परिसर






## जालन्यात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा सुपडा साफ

जालना जिल्ह्यातील शिवसेना (उद्धव ठाकरे) जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांच्यासह विविध आघाडीचे जिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख, उपप्रमुख, जिल्हा परिषद सदस्य, माजी नगरसेवक, पंचायत समिती सदस्य यांनी मोठ्या संख्येने शिवसेना (शिंदे गट) प्रवेश केला. प्रसंगी हरिहर शिंदे, निवृत्ती गायके, बबन खरात, नंदू दाभाडे, अंकुशराव शिंदे, बाला परदेशी, दुर्गेश काठोठीवाले, घनशाम काठोठीवाले, अंकुशराव शिंदे, महेश रायकर, आश्विन अंबेकर, अंकुश वाघ, भगवान भोजने, सचिन जाधव, देवनाथ जाधव, बद्रीनाथ जऱ्हाड, योगेश जाधव यांच्यासह अनेकांनी शिवसेना (शिंदे गटात) उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. एक प्रकारे जालन्यातून उद्धव ठाकरेंचा सुपडा साफ झाल्याचे चित्र आहे.

**जालना । प्रतिनिधी -** येथे गर्दीचा महापुर आला आहे. ही गर्दी पाहता महानगर पालिकेवर भगवा फडकणार म्हणजे फडकणारच त्याच बरोबर समोच्याचे डिपॉझिट जप्त होणार असल्याचा विश्वास शिवसेनेचे नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे व्यक्त केला. बुधवार (दि १२) रोजी जनार्धन मामा चौकात आयोजित शिवसेना कार्यकर्ता मेळाव्यास ते संबोधित करत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आ. अर्जुनराव खोतकर, आ. हिकमत उढाण, श्री पटवर्धन, अनिरुद्ध खोतकर, संजय लाखे पाटील, पंडीत भुतेकर, ए. जे. बोराडे, विष्णू पाचफुले, अभिमन्यू खोतकर, मोहन अग्रवाल, भास्कर अंबेकर, दुर्गेश काठोठीवाले, हरिहर शिंदे यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

**शिवसेनेची कामाची पद्धत वेगळी**

आपल्या शिवसेनेची कामाची पद्धत वेगळी आहे. येथे गट प्रमुख आणि बुथ प्रमुख महत्त्वाचे आहेत. तुमच्यात स्पर्धा हवी, माझा बुध सर्वात मजबुत, या व्यासपीठावर आता सगळे नेते आहेत. गर्दीतील एक पाटी त्यांनी यावेळी वाचली. एकनाथ शिंदे नेक आहे, खोतकर- अंबेकर एक आहे. गनिमी काव्यात खोतकर खरचं एक नंबर असल्याचे श्री शिंदे यांनी यावेळी म्हटले. त्यांनी का कुणाला मागे ठेवले ते आता कळायला लागले आहे. तिकडे राहून करेक्ट कार्यक्रम करायचा हे अर्जुनराव- भास्कररावांना माहिती आहे. तुम्ही निवडून दिले त्याबद्दल मी येथे आभार व्यक्त करायला आलो असल्याचे जनसमुदायाला उद्देशून ते म्हणाले. व्यापारी हे ब्रँडींग करतात त्यामुळे व्यापाऱ्यांची काळजी शिवसेना नेहेमीच घेते. श्रीकांत शिंदे हे डॉक्टर आहे, मी डॉक्टर नाही, मित्र, काही औषध, गोळ्या मी ही देतो. मी ही मोठा कार्यक्रम करेक्ट लावला होता. त्याचे कारण सांगतांना श्री शिंदे म्हणाले की, राज्याचा विकास थांबला होता, सगळं ठप्प होते. बाळासाहेब ठाकरे म्हणायचे शिवसेनेची काँग्रेस होऊ देणार नाही. यांनी शिवसेनाच काँग्रेसच्या दावणीला बांधली. त्यामुळे उठाव करावा लागला. राज्यातील जनतेसाठी, शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी विकासासाठी हा उठाव होता. विधानसभेला ८० जागा लढवून ६० जागा जिंकल्या. घरात बसणारे लोकं आता बांधावर जावू लागले आहेत. फुकाचा ताठा नाव उबाठा, तुम्ही कितीही शिव्या द्या नावें ठेवा आम्ही कामातून उत्तर देऊ. मराठवाडा संकटात असतांना शिवसेना मागे राहू शकत नाही. ३२ हजारांचे पॅकेज दिले. खात्यात पैसे पडताहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ७० हजार रुग्णांना ४५० कोटी रु दिले. कोल्हापूर येथील एक किस्सा त्यांनी यावेळी येथे सांगितला.

**बुडाला जळतंय अन् हे डोंगरावची आग विझवायला पळतंय**

मदत करतांना या हाताचे या हाताला कळू दिले नाही. अनेक विकासाचे प्रकल्प राबविले. हे डबल इंजिन सरकार योग्यरित्या चालू आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरू केली. त्यावेळी विरोधक कोर्टात गेले. खोडा घालण्याचा प्रयत्न केला. माझ्या बहिणींनी त्यांना २३२ नंबरचा जोडा दाखविला. त्यांचा सुपडा साफ झाला. महाराष्ट्राच्या इतिहासा २३२ आमदार पहिल्यांदा महायुतीचे निवडुन आले. श्री शिंदे यांनी मी असे प्रयत्न लाडकी बहिण योजना बंद होणार नसल्याचा शब्द दिला. शिवसेना पुढे जात आहे. म्हणून यांची पोटदुखी होत आहे. आपल्याकडे बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरु केलेला आहे. बुडाला जळतंय अन् हे डोंगरावरची आग विझवायला पळतंय अशी अवस्था त्यांची झाल्याचा टोला उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता शिंदे यांनी मारला.

**लाडकी बहिण योजना सुरूच राहणार**

मी सर्वसामान्य परिवारातून आहे. माझ्या आईचे माझ्या पत्नीचे दुख मी जवळून पाहिले आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींसाठी पंधराशे रुपये योजना आणली. सोन्याचा चमचा घेऊन जन्मलेल्यांना पंधराशे रुपयांचे महत्त्व कळणार नाही. मला काय मिळेल यापेक्षा ज्यांनी खुर्चीवर बसविले त्यांच्यासाठी काम करायचें, त्यांचे प्रश्न सोडवायचे हा एकच अजेंडा आहे. त्यांच्यासाठी सोन्याचे दिवस आणायचे आहे. मी आजही कार्यकर्ता होतो, उद्याही कार्यकर्ताच राहणार आहे. लाडका भाऊ ही ओळख माझ्यासाठी खुप मोठी असल्याचेही श्री शिंदे म्हणाले.

बैलगाडा शर्यतीवर पश्चिम महाराष्ट्राचा वरचष्मा असायचा यंदाच्या कोल्हापूर येथील बैलगाडा शर्यतीत संभाजीनगर व हिंगोली येथील गरीब शेतकऱ्यांनी फॉच्युनर जिंकली आहे. त्या शेतकऱ्यांवर वीस बावीस लाखांचे कर्ज होते. म्हणजे मराठवाड्यातही या बैलगाडा शर्यतीला महत्त्व आले आहे. आमच्या सरकारने गोमातेचा दर्जा दिला. एसटी प्रवासात महीलांना ५० टक्के सवलत दिली. मुलींचे उच्च शिक्षण पुर्ण मोफत केले. उद्योगधंद्याचे प्रश्न असो शेतकऱ्यांचे प्रश्न आम्ही सोडवण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत.

**दगाबाज कोण?**

घर का ना घाटका अशी अवस्था आता झाली आहे. सरकार आम्ही पाडलं नाही, तुमच्या कर्तुत्वाने ते पडलं असल्याची टिका ही उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांनी केली. लाखो लोकं शिवसेनेशी जुडताहेत, हजारो पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करताहेत, एकदा शब्द दिला म्हणजे दिला. एकबार मै कमिटमेंट करता हूं तो बाद मे खुद की भी नही सुनता. शाखा प्रमुख ते मुख्यमंत्री होतांना अनेक दुख झेलली, संघर्ष केला. हा पक्ष कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. जो काम करेल तो पुढे जाईल. माझे वैभव संपत्ती ही व्यासपीठावर बसलेली आहे, तर ऐश्वर्य हे पुढे आहे.

**जालना जिल्ह्यासाठी आश्वासने; मी कार्यकर्ता होतो, आहे आणि राहीन**

जालना- नांदेड समृद्धी बाधीत शेतकऱ्याचे प्रश्न, महात्मा फुले मार्केट बांधण्यासाठी, जालनेकरांना दररोज पाणी देण्यासाठी, येथील रस्ते, नाल्या, विविध विकासकामांसाठी नगर विकासच्या माध्यमातून तसेच सरकार म्हणून जे जे करता येईल ते सर्व करणार असल्याची ग्वाही जालनेकरांना यावेळी श्री शिंदे यांनी दिली. त्याचबरोबर सिडको भुसंपादन, ४२ झोपडपट्टी धारकांना पीआर कार्ड, एमडीएमस ३५ जागा वाढवून दिल्या, हतवण तलाव भुसंपादनाचा प्रश्न जलसंपदा मार्गी लावू. अर्जुनराव खोतकरांच्या मागणीवरून महानगर पालिका केली. जे जे मागितले, ते ते देण्याचे काम केलं. जालना घनसावंगी आता उड्डाण घेणार आहे. शेवटी येत्या काळात विविध प्रकल्पाच्या भूमिपुजन, लोकार्पणासाठी आपण परत येणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

या मेळाव्याने जालना जिल्ह्यातील शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी भगवा झेंडा फडकविण्याचा आत्मविश्वास कार्यकर्त्यांत दिसून येत आहे.

## उपमुख्यमंत्री शिंदेच्या उपस्थितीत आ. हिकमत उढाणांचे मतदार यादीवर प्रश्नचिन्ह

शिवसेना कार्यकर्ता मेळाव्यास शिवसेनेचे नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जालना येथे आले असता, आ. हिकमत उढाण यांनी मतदार यादीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले मतदार यादीतील दुबार नोंदणी, तिबार नोंदणी आणि चौबार नोंदणी सह मृत व्यक्ती तसेच स्थलांतर झालेले मतदार शोधण्याचे काम युद्ध पातळीवर करावे लागेल. गावागावात पडताळणी करावी लागणार आहे. त्यासाठी सर्वांनी कामाला लागण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे विरोधकांकडून होत असलेल्या मतदार यादीतील घोळाबाबतच्या वक्तवयाला एकप्रकारे आ. हिकमत उढाण यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समोरच दुजोरा भर सभेत दिला आहे. त्याचबरोबर अतिवृष्टीने बाधीत शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. गोदाकाठची चाळीस गावातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना सरकार म्हणून नव्हे तर स्वखर्चातून एकनाथ शिंदे यांनी हजारो किट दिल्या आहे. राज्य-केंद्राने पॅकेज जाहीर केले. अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात पडत आहे. हे सरकार संवेदनशील आहे. कर्जमाफीसाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. लवकरच कर्जमाफी होणार असल्याचेही आ. उढाण यांनी यावेळी म्हटले आहे.

## ठाकरे गटात घुसमट; विकासासाठी शिवसेनेत - भास्कर अंबेकर

पक्षप्रवेशानंतर बोलतांना भास्कर अंबेकर श्री पटवर्धन यांनी पक्षात यायला उशिर झाला असे विचारल्यानंतर मै देर करता नहीं देर हो जाती हैं, असे उत्तर त्यांना दिल्याचे सांगत जालनेकरांच्या विकासासाठी शिवसेना (शिंदे गट) सर्व सहकार्यांसह प्रवेश केला असल्याचे भास्कर अंबेकर यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले अर्जुनराव आणि मी महाविद्यालयीन काळात बाळासाहेब ठाकरेंमुळे शिवसेनेत आलो. १९९० ला ते आमदार झाले मी १९९१ ला नगरसेवक झालो. शिवसेनेची पायाभरणी तेथून आम्ही केली. अनेक केसेस अंगावर घेतल्या, अनेक आंदोलने केली. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषदा जिल्ह्यात सर्वत्र शिवसेनेचा भगवा फडविण्याचे काम आम्ही दोघांनी केले. अर्जुनराव आणि मी भावांसारखे आहोत. मला उद्धव ठाकरे गटात १९९० पासून थांबविण्याचे काम झाले. प्रत्येक वेळी मला थांब शब्द भेटत होते. बदनापूर मतदार संघातून उमेदवारी मिळणार असल्याचे सांगण्यात आल्यानंतरही ऐन वेळी थांबण्यास सांगितले मी तरी देखील मी थांबलो. एमएलसीवर घेतो म्हंटले ते ही घेतले नाही. एका महामंडळाचे उपाध्यक्ष केले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी ते महामंडळच बरखास्त करुन टाकले. माझ्या आजारपणात मला अर्जुन खोतकरांनी बळ दिले. एकनाथ शिंदेंनी मला फोन करुन विचारणा केली. एकनाथ शिंदे हे कार्यकर्त्यांच्या पाठीमागे उभा राहणारे नेतृत्तव आहे. आणि त्यामुळे ते नेतृत्व स्विकारुन मी आज शिवसेनेत प्रवेश केला आहे. ४० वर्षांपासून मी राजकारणात आहे. शिंदे यांच्या सारखा नेता पाहिला नाही. त्यांनी शहर विकासासाठी कोणताही प्रस्ताव घेऊन या मी सर्वोतोपरी मदत करण्यासाठी तयार असल्याचा शब्द दिला आहे. या शहर विकासासाठी मी शिवसेनेत आलो असून या पुढील सर्व निवडणुकीत शिंदे यांनी दिलेल्या प्रत्येक उमेवारांसाठी काम करत राहणार असल्याचे ते म्हणाले.

## शहराचा चेहरा मोहरा बदलून टाकल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही - आ. खोतकर

ज्या वेळेस मी पक्षात प्रवेश केला त्या वेळेस लोकं म्हणत होते, उबाठाचे पदाधिकारी आले नाहीत. आज संपूर्ण उबाठा येथे साफ झाली असल्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी येथे म्हटले आहे. त्याच बरोबर येत्या चार वर्षांत विविध विकास कामांच्या माध्यमातून शहराचा चेहरा मोहरा बदलून टाकल्याशिवास स्वस्थ बसणार नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, शिंदे साहेबांनी दोनदा विचारले, तुमचा भाऊ कुठयं, अंबेकर दिसत नाहीत. काही लोकं मागे ठेवावे लागतात. मागच्या विधानसभेत भास्कररावांनी काय केले. अंबेकर आणि माझं पक्षाचे नातं नाही. पारिवारीक नाते आहे. लोकं मुलीच्या लग्नात सुपारी मामाच्या हातांनी फोडतात. मी माझ्या मुलीची सुपारी भास्कर अंबेकरांची हाताने फोडलेली आहे. विधानसभेपुर्वी शिंदेची सभा जालन्यात झाली होती त्यावेळी त्यांनी शब्द दिला होता. शहर विकासासाठी एक हजार कोटी रुपये देणार. अवघ्या एका वर्षांत त्यांनी लाडक्या आमदाराला पाचशे कोटी रुपये जालन्याच्या सर्वांगिण विकासासाठी दिले आहेत. बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले हे दोनदा उच्चारित त्यांनी एकनाथ शिंदेंची प्रशंसा केली. राजकारणात शब्द फिरवला जातो मात्र, एकनाथ शिंदे हे शब्दाला जागणारे आहेत. पक्षात भास्कर अंबेकरांनी आता प्रवेश केला आहे. पक्षाची मोठी ताकद वाढली आहे. येणाऱ्या चार वर्षांत शहराचा चेहरा मोहरा बदलून टाकल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. ४२ झोपडपट्टीवासियांना पीआर कार्ड मिळविण्यासाठी मी स्वतः उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे आग्रह धरला. व तो पूर्ण केला. पण काही लोकं फुकटचं क्रेडीट घेताहेत. सोलार पॅनलसाठी महानगर पालिकेला १०० कोटी रु शिंदे यांनी दिले. एनर्जी ग्रिन असलेली महाराष्ट्रातील पहिली महानगर पालिका ही जालन्याची आहे. गणेश भक्त, दुर्गा माता भक्त, उत्तर भारतीयांच्या छटपुजेसाठी १९ कोटी रुपयांचा घाट - कुंड बांधण्यासाठी दिले. एकनाथ शिंदे यांनी १५ हजार घरकुल मला म्हणजेच जालनेकरांसाठी दिले आहे. आणखी अकरा हजार घरकुलांची आवश्यकता आहे. आणि मला खात्री आहे ते घरकुलंही लवकरच मंजूर होतील. पाणी समस्या पाहता ३५ एमएलडी फिल्टर बेड एका दिवसात मंजूर करून दिला. त्याचे काम ९० टक्के पूर्ण झाले असून येत्या दोन महिन्यात जालनेकरांना दररोज पाणी मिळेल अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. शेतकरी उपोषणाचा विषयही आ. खोतकर यांनी यावेळी काढत अधिकाऱ्यांची हजेरी घेण्याची विनंती एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. महात्मा फुले मार्केटच्या विषयाला गती देण्यासह विविध विषय यावेळी आ. खोतकरांनी शिंदे समोर मांडले. येणाऱ्या महानगर पालिकेत महापौर हा शिवसेनेचा बसविणार असा विश्वास देखील आ. खोतकर यांनी यावेळी व्यक्त केला.

# संपादकीय पान

## सार्वभौमत्वावर हल्ला

भारताची राजधानी असलेल्या दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी भीषण आत्मघाती हल्ला झाला. एका मोटारीत झालेल्या भीषण स्फोटाने केवळ राजधानीच नव्हे तर संपूर्ण देश हादरला. या भीषण स्फोटात १३ निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला तर २५ हून अधिक नागरिक जबर जखमी झाले. या हल्ल्यानंतर संपूर्ण देशात हाय लर्ट घोषित करण्यात आला. केंद सरकारने या भ्याड हल्ल्याचा तपास एनआयएकडे सोपवला आहे. एनआयए या हल्ल्याचा योग्य तपास करून यामागे कोण आहे हे शोधून काढतीलच पण हा हल्ला पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी घडवला हे शाळकरी मुलेही सांगू शकेल. मागील काही वर्षापासून शांत असणारे दहशतवादी पुन्हा सक्रिय झाले आहेत हेच या हल्ल्यातून स्पष्ट होते. भारतात दहशतवादी कारवाया करून निष्पाप नागरिकांना टार्गेट करायचे आणि देशात अशांतता माजवायची त्यातूनच देशात धार्मिक दंगली घडवून देशात अराजकता माजवण्याचा दहशतवाद्यांचा मनसुबा आहे. भारतासोबत सम रोसमोर युद्ध करून आपण जिंकू शकू नाहीत हे पाकिस्तानला ऑपरेशन सिन्दुर नंतर समजले असेल म्हणूनच त्यांनी पुन्हा एकदा आपला जुना पॅटर्न वापरायला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी दहशतवाद्यांना पुन्हा सक्रिय केले. या हल्ल्याच्या आदल्या दिवशीच तीन शहरांमध्ये रासायनिक हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा महाभयानक कट पोलिसांनी उघडकीस आणला. गुजरात पोलिसांच्या कारवाईपाठोपाठ जम्मू काश्मीर पोलिसांनी दहशतवाद्यांचे जाळे उद्ध्वस्त करून सात जणांना अटक केली. हरियाणातील फरीदाबरमधून तब्बल तीन हजार किलो आरडीएक्स हस्तगत केले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. सुरक्षा यंत्रणेचे याबाबत कौतुकच करायला हवे. जर ही स्फोटके सापडली नसती आणि दहशतवाद्यांचे मनसुबे यशस्वी झाले असते तर देशात हाहाकार उडाला असता. हरियाणा, जम्मू काश्मीर प्रमाणे दिल्लीतील स्फोट मात्र सुरक्षा यंत्रणेला रोखता आला नाही त्यामुळे निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला. २०११ नंतर पहिल्यांदाच दिल्लीत इतका भीषण हल्ला झाला. हा हल्ला म्हणजे भारतीय सार्वभौमत्वावर केलेला हल्ला आहे म्हणूनच याचा बदला घ्यायला हवा. भारताने या हल्ल्याचा बदला घेऊन दहशतवाद्यांना जशास तसे उत्तर द्यायला हवे. काही महिन्यांपूर्वी दहशतवाद्यांनी पहलगाम येथे अशाच प्रकारे निष्पाप नागरिकांना टार्गेट करून जीवे मारले. त्यानंतर भारताने पाकिस्तामात घुसून दहशतवाद्यांची तळे उद्ध्वस्त केली आणि १०० हून अधिक दहशतवाद्यांना ढगात पाठवले. कदाचित त्यामुळेच चवताळलेल्या दहशतवाद्यांनी देशात दहशतवादी कारवायांना सुरुवात केली असेल. अर्थात दहशतवाद्यांना याचीही शिक्षा मिळणार यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर राबवून भारतीय सैन्याने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला भविष्यात ऑपरेशन सिन्दुर पार्ट २ राबवून दिल्ली हल्ल्याचाही बदला घेतला जाईल. सरकार त्यांचे काम करेलच पण आता नागरिकांचीही जबाबदारी वाढली आहे. आपल्या शहरात, परिसरात काही संशयास्पद गोष्टी घडत असल्याची शंका जरी नागरिकांना आली तरी नागरिकांनी पोलिसांना त्याची माहिती द्यावी. दहशतवाद्यांचे स्लीपर सेल शहाराशहरात अस्तित्वात असण्याची शक्यता आहे. जर अशाप्रकारे कोणता व्यक्ती किंवा संघटना संशपस्पद कृत्य करताना आढळले तर त्याची सूचना पोलिसांना द्यावी. कोणत्याही बेवारस वस्तूंना हात लावू नये. बेवारस वस्तू जर आढळल्या तर त्याचीही सूचना पोलिसांना द्यावी. नागरिकांनी सतर्क राहिल्यास दहशतवाद्यांचे मनसुबे सफल होणार नाहीत. दहशतवादी म्हणजे माणुसकीचे शत्रू आहेत. माणुसकीच्या शत्रूंना नामोहरण करण्याची जबाबदारी जितकी सरकारची आहे तितकीच नागरिकांचीही आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# सावधान... दिल्ली स्फोटांनी हादरली !!

देशाची राजधानी दिल्ली स्फोटांनी हादरली. लाल किल्ल्यासमोर लाल रक्ताचा सडा पडला. १२ जणांचा आतापर्यंत जीव गेला, दोन डझन लोक जखमी आहेत. हा दहशतवादी हल्ला आहे की दुसरं काही, हे घटनेच्या २० तासापर्यंत सम ोर आले नाही. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्रालयाने तपास एनआयएकडे सोपवला. देशाच्या राजधानीत, लाल किल्ल्यासमोर दहशतवादी हल्ला होतो हे सुरक्षा यंत्रणांचे घोर अपयश आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लाल किल्ल्यावरून ब्रिटिशांचा युनियन जॅक उतरवला आणि भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा फडकवला. स्वातंत्र्यदिनी याच लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवला जातो. त्याच्या समोरच मंदिर, मशिद, चर्च, गुरुद्वारा आहे. या भागात झालेला स्फोट हा या देशाच्या एकात्मतेला तडा देण्याचा प्रयत्न होता का याचाही शोध आता तपास यंत्रणांनी घ्यायचा आहे. पण अशा एखाद्या स्फोटाने भारताची एकता भंग होणार नाही. लाल किल्ला, चांदणी चौक या परिसरात भारताचे दर्शन होते. हेच पाहण्यासाठी जगभरातील प्रवासी येथे पर्यटनासाठी येत असतात. या सगळ्यांना दहशतीत ठेवण्यासाठी हा हल्ला होता का?

गेल्या चोवीस तासात समोर आलेल्या माहितीनुसार, दिल्लीला लागून असलेल्या हरियाणातील फरीदाबादमध्ये दहशतवाद्यांचे एक मॉड्यूल काम करत होते, त्याचा छडा जम्मू-काश्मीर पोलिसांनी लावला. तीन डॉक्टर तरुणांना फिरीदाबादमधून ताब्यात घेण्यात आलं. तर दुसरीकडे गुजरातमधील अहमदाबादमध्ये गुजरात एटीएसने छापेमारी करून दहशतवादासाठी विषाचा वापर करू इच्छिणाऱ्या डॉक्टरला अटक केली. दोन्ही छापेमारी, अटकेच्या कारवाईत एक समान धागा आहे. दोन्ही ठिकाणी डॉक्टर तरुण आहेत. अहमदाबादमध्ये पकडलेला डॉक्टर चीनमधून शिक्षण घेऊन आलेला आहे. डॉ. अहमद मोहियुद्दीन सय्यद याच्यासह आझाद सुलेमान शेख आणि सुहेल मोहम्मद सलिम या तिघांना गुजरात एटीएसने अटक केली. त्यांच्याकडून एरंडीचे तेल, पिस्तूल आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. एरंडीच्या तेलाचा विष तयार करण्यासाठी तो वापर करणार होता. दिल्ली स्फोटात समोर आलेल्या माहितीनुसार स्फोट घडलेल्या ठिकाणी छर्रे, खिळे काहीही सापडलेले नाही. शक्तिशाली स्फोट होऊन १२ लोक ठार झाले पण स्फोट कशाचा होता हे अजून कळू शकलेले नाही. फरीदाबादमधील छाप्यात जम्मू-काश्मीर पोलिसांनी डॉ. आदिल अहमदला अटक केली. त्याच्या माहितीवरून डॉक्टर मुजाहिल शकील याला काश्मिरमधील पुलवामा येथून अटक झाली. ज्याच्या कारमध्ये स्फोट झाला तो देखील डॉक्टर होता असा दावा केला जात आहे. डॉ. मोहम्मद उमर हाच कार घेऊन लाल किल्ला परिसरात आला असल्याचे पुरावे समोर येत आहेत. त्याने आत्म घातकी हल्ला केल्याचा आरोप आहे. त्याच्या आई, वडील, भाऊ, मित्रांना ताब्यात घेण्यात आलंय. डॉ. उमर हा अल-फलाह विद्यापीठात फॅक्लटी होता. एकंदर सर्व उच्चशिक्षित या प्रकरणात अटक अटक झालेले आहेत. डॉ. शाहिना ही महिलादेखील पोलिसांच्या ताब्यात आहे. त्यांचे एकमेकांसोबत लागेबांधे उघड होत आहेत. त्यांनी खरंच हे केलं असेल तर त्यांचा ब्रेन वॉश कोणी केला हे शोधण्याची खरी गरज आहे. त्यांच्या मनात स्वतःच्याच देशाविषयी, देशबांधवांविषयी विष कोणी पेरलं की ते विषाचं इंजेक्शन घेऊन फिरत होते ?

हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हल्ल्यातील दोषींना सोडणार नसल्याचे म्हटले आहे. मात्र त्यांनी भूतानचा दौरा रद्द करून त्यांच्या देशाच्या राजधानीत राहूनच हे म्हटलं असतं तर अधिक बरं झालं असतं. मनावर मोठं ओझं घेऊन मी आलो, असं ते म्हणत असले तरी अशी अनेक ओझी आता त्यांच्या मन आणि डोक्यावर झाली आहेत. २०१५ मध्ये उधमपूर येथे बीएसएफच्या ताफ्यावर हल्ला झाला होता. पठाणकोट एअरबेसला लक्ष्य करण्यात आले होते. त्याचवर्षी २०१६ मध्ये उरी येथे लष्कराच्या छावणीवर हल्ला झाला, त्यात १९ जवान शहीद झाले. २०१९ मधील पुलवामाचा हल्ला देशाला हदरवणारा होता. ४० सीआरपीएफ जवान शहीद झाले होते. या हल्ल्यानंतर भारताने बालाकोट एअर स्ट्राईक केले होते, हेही विसरता येणार नाही. मात्र यानंतरही हल्ले थांबले नाहीत. २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाममध्ये लष्कराच्या गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांना मारले. हे ओझंही पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहांच्या मन आणि डोक्यावर आहे. भारतावर होणारे हे घाव का थांबत नाहीत. याचा शोध कोणती यंत्रणा घेणार? दिल्लीतील हल्ल्यात देशातील फक्त काश्मीरचे तरुण नाहीत तर देशभरातील विविध भागातील उच्चशिक्षित पुरुष आणि महिला असल्याचे समोर येत आहे. दहशतवादाचा हा भस्मासूर कसा संपवता येईल. दिल्लीसारख्या ठिकाणी लोक सुरक्षित नाहीत तर कुठे सुरक्षित आहेत, हे सरकारने सांगावे. आता देशभर सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले आहे. प्रत्येकांच्या बॅगा तपासल्या जात आहेत. यामुळे संपूर्ण देशच आता दहशतीच्या सावटाखाली आहे. ही दहशत संपवण्यासाठी अजून खूप काही करण्याची गरज आहे. त्यासाठी आता भारतातील प्रत्येक नागरिकाला सैनिक होऊन आपण जिथे आहोत तिथून देशाच्या सुरक्षेच्या कामात सहभागी व्हावे लागेल. कारण शत्रूने आपले हात आणि हस्तक आपल्या आजूबाजूला पसरवले आहेत.

**ह.भ.प.श्री.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर**

## म्हसरूळ येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाबाबत कृषी विभागाचे मार्गदर्शन

**विशाल देशमुख टेंभूर्णी -** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत निवड झालेल्या गावांमध्ये वैयक्तिक लाभाच्या घटकांचे अर्ज दिनांक १८ ऑक्टोंबर २०२५ पासून स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे.या निमित्ताने ग्रामस्थरीय कृषी संजीवनी समिती म्हसरूळ गावातील शेतकऱ्यांना योजनेबद्दल सविस्तर म ार्गदर्शन तालुका कृषी अधिकारी व कृषी सहाय्यक अधिकारी श्री शरद सहाणे साहेब यांनी म्हसरूळ येथे उपस्थित राहून म ार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शना मध्ये वैयक्तिक लाभाचे घटक असे की वाणीकी आधारित वृक्ष लागवड, बांबू लागवड, फळबाग लागवड, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, वैयक्तिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण, सामूहिक शेततळे, शेडनेट गृह, हरितगृह, गांडूळ खत, नाडेप, विहीर पुनर्भरण ,पाईप ,पंपसंच, बीज उत्पादन, रेशीम उद्योग, शेततळ्यातील मच्छी पालन, शेळीपालन,बीपीएफ पद्धतीने लागवड विजेतपादन इत्यादी योजना विषय सविस्तर मार्गदर्शन केले . कृषी सहाय्यक अधिकारी शरद सहाने यांनी ठिबक सिंचन बाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले, याप्रसंगी प्रस्ताविक म्हसरूळ येथील सरपंच मंगेश लहाने यांनी केले. शेतकऱ्यांच्या वतीने माजी सरपंच ज्ञानेश्वर शेजुळ यांनी शेतकऱ्यांच्या समस्या व अपेक्षा व्यक्त केल्या व वारंवार अशा सभा आयोजित करून कृषी सहाय्यक अधिकारी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात म्हणून त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी बैठकीस गावचे प्रथम नागरिक श्री मंगेश लहाने, माजी सरपंच ज्ञानेश्वर शेजुळ , माजी उपसरपंच मनोहर म्हस्के, कडूबा लहाने, शिवाजी बढे, संदीप लहाने, अमोल लहाने, सुनील जाधव ,रविंद्र लहाने, कल्याण लहाने.माजी सरपंच रवींद्र बदर,पत्रकार कृष्णा लहाने,पुरुषोत्तम लहाने,नितीन म्हस्के,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत संजीवनी समिती सदस्य , कृषी सहाय्यक अधिकारी शरद सहाने व शेतकरी मोठ्या संख्येने सभेस उपस्थित होते. सभेचे आभार प्रदर्शन माजी सरपंच ज्ञानेश्वर शेजुळ यांनी केले.

## मार्केटिंग फेडरेशनचे गोदाम बेकायदेशीर पाडल्या प्रकरणी दोशींवर गुन्हे दाखल करा - पानसरे

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा येथील मार्केटिंग फ ेडरेशनचे गोदाम बेकायदेशीरपणे पाडण्यात आले असून या प्रकरणांने पुन्हा एक वळण घेतले आहे. याप्रकरणी दोषीवरील विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून तात्काळ कार्यवाही करावी , अशा सूचना महाराष्ट्राचे सहकारी पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांनी मंठा येथे केले. याप्रकरणी तात्काळ गुन्ह्यात वाढ करावी नसता , या ठिकाणी आंदोलनाचा पवित्रा त्यांनी घेतला होता.यावेळी दि.म हाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह मार्केटिंग फ ेडरेशन लिमिटेडचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे , स्थानिक संचालक छत्रपती संभाजीनगर ( विभाग ) पांडुरंग घुगे , सरव्यवस्थापक मालमत्ता मुंबई नितीन यादव , जिल्हा पणन अधिकारी जालना राजेश हेमके , प्र. जिल्हा पणन अधिकारी छत्रपती संभाजीनगर विजय राठोड , खरेदी विक्री संघ अध्यक्ष भाऊसाहेब गोरे , उपाध्यक्ष सचिन बोराडे, अजय अवचार , शरद पाटील, खुशाल ईघारे ,प्रकाश घुले , गोविंद नवघरे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



मागील महिन्यापासून मंठा शहरातील गाजलेल्या वादग्रस्त प्रकरणात जिल्हा पणन अधिकारी कार्यालय जालना यांच्या ताब्यातील मंठा येथील मार्केटिंग फेडरेशनचे गोदाम बेकायदेशीरपणे पाडण्यात आले असून या घटनेमुळे प्रचंड खळबळ उडाली आहे. जिल्हा पणन अधिकारी राजेश हेमके यांच्या फिर्यादीवरून तक्रार देखील दाखल करण्यात आली होती. सदर गोदाम मार्केटिंग फेडरेशनच्या असताना मार्केटिंग फेडरेशनच्या ताब्यात असलेले मंठा येथील गोदाम व जागेबाबत कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा सभापती व सचिव यांनी ना हरकत प्रमाणपत्र देऊन मार्केटिंग फेडरेशन कुठलीही कल्पना न देता अनाधिकृतपणे रात्रीच्या वेळेला सर्वे नंबर ४२ मधील गोदाम पाडल्या प्रकरणात बाजार समि ती सभापती व सचिव तसेच दत्तात्रय किसनराव हातकडके व इतर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणामध्ये गोदाम पाडून शासकीय म ालमत्तेचे नुकसान व यातील साहित्य व खत चोरीला गेल्यासह विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून यात अनेक आरोपी आहेत सर्व दोषींवर कार्यवाही करण्यात यावी , या मागणीसाठी भाऊसाहेब गोरे यांनी आवाज उठवला. त्यांनी आवाज उठवल्यानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांनी मंठा येथे तात्काळ भेट देऊन गोदाम पाडल्या प्रकरणी शासकीय मालमत्तेचे नुकसान करून साहित्य चोरी केल्याप्रकरणी व गोदाम पाडताना वापरलेले पोकलॅण्ड हायवा ट्रॅक्टर यासह ब्लास्टिंग ट्रॅक्टर या सर्व दोषींवर गुन्हे दाखल करावे , असे देखील त्यांनी यावेळी पानसरे बोलतांना सांगितले.

# माणसातील अमानुषता कमी कधी होणार?

आजकाल माणसाने माणसासारखे वागणे व जगणे सोडून दिले आहे. माणूस माणुसकीला शोभणारे वर्तन न करता माणुसकीला अशोभनीय वर्तन करून माणुसकीला डागाळत आहे. मानव प्राण्यातील माणुसकी कमी होऊन अमानुषता वाढीस लागली आहे. एकेकाळी माणसांमध्ये माणुसकीचे गुणधर्म ठळकपणे दिसायचे परंतु आजकाल माणसांमध्ये माणुसकीचा लवलेशही दिसत नाही. ज्या माणसांमध्ये माणुसकी ठासून भरली आहे, अशी माणसे बोटावर मोजण्या इतकीच राहिली आहेत. म्हणजे माणसासारखे वागणारी म ाणसे कमी झाले आहेत. आणि अमानुष माणसांचा सुळसुळाट वाढला आहे. माणूस माणसासारखे वागायचे सोडून जंगली प्राण्याप्रमाणे किंवा रानटी पशु प्रमाणे वागत आहे. माणसाने माणसासारखा व्यवहार केला तर माणुसकीला आणखीन शोभा येणार आहे. माणुसकी बावन्नकशी सोन्यासारखी चकाकणार आहे. माणूस माणसासारखा वागू लागला तर आपल्या देशाची प्रगती नक्कीच होणार आहे. म्हणून माणसाने अमानुषता सोडून देणे आणि अंगी माणुसकी वाढवणे काळाची गरज आहे. परंतु आजकाल माणुसकी हिन लोकांचा बोलबाला सुरू आहे. चांगली व माणसासारखे वागणारी माणसे अशा अमानुष लोकांना घाबरून त्यांच्यापासून चार हात लांब राहत आहेत. सध्या देशात बलात्कार, अत्याचार, व्याभिचार, अनाचार आणि भ्रष्टाचार फोफावला आहे. अशा कृत्यामुळे भारतासारख्या पावन भूमीला कलंक लागत आहे. प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला असुरक्षित आहेत. त्यांना संरक्षणाची गरज आहे. प्रत्येक क्षेत्रातील महिलांवर बलात्कार होत आहे. त्यांच्यासोबत अश्लील चाळे केले जात आहेत. भारतात बलात्काराने कळस गाठला आहे. लहान बालीकेपासून ते वृद्ध आजीपर्यंत बलात्कारी बलात्कार करून मोकळे होत आहेत. कधी शाळेतील मुलीवर बलात्कार होतो, कधी कंपनीत काम करणाऱ्या महिलेवर अत्याचार होतो तर कधी रस्त्याने कॉलेजला जाणाऱ्या मुलीवर अत्याचार होतो. माणूस खुशाल राक्षसी कृत्य करून माणुसकीला काळीमा फासत आहे. आपली भारत भूमी संतांची, महंतांची, महापुरुषांची, युगपुरुषांची आणि क्रांतिकारकांची पवित्र भूमी म्हणून ओळखली जाते. या महापुरुषांनी व संतांनी आपल्या भारत भूमीत चांगल्या व निर्मळ विचारांची पेरणी करून माणसाला माणसासारखे वागण्याची नीतिमत्ता देऊन गेले. म्हणजे त्यांनी देशात सुविचारांची पेरणी केली खरी पण कालांतराने माणसाची नीतिमता कलुषित होऊन माणूस मानवता सोडून अविचारी व माणुसकी हिन जीवन जगू लागला. माणसांमध्ये स्वार्थी भावना वाढीस लागल्यामुळे माणूस स्वार्थासाठी काहीही करू लागला. माणूस नातीगोती, भाऊबंदकी म्हणजे रक्ताची व जोडलेली नाती विसरून स्वार्थापायी माणुसकीला कलंकित करू लागला आणि आई-वडिलांना घराबाहेर काढून त्यांच्यापासून अलिप्त जीवन जगू लागला. आजकालचा माणूस सख्ख्या भावासोबत वैर धरून त्याच्यासोबत कुटील डाव रचून त्याचा काटा काढण्याचा बेत आखत आहे. शेतीच्या वाटणीसाठी किंवा घराच्या वाटणीसाठी गुंठाभर जागेसाठी व इंचभर जमिनीसाठी सख्ख्या भावासोबत रक्तरंजित खेळ खेळत आहे. आपल्या देशात गरीब व श्रीमंत दरी वाढत चालली आहे. गरीब आणखीन गरीब होत आहेत आणि श्रीमंत आणखीन श्रीमंत होत आहेत. गरीब श्रीमंत दरी कमी न होता फार भयानक व विखारी रूप धारण करत आहे. श्रीमंतांना जराही गरीब लोकांची किव येत नाही. गरिबांबद्दल त्यांच्या मनात जराही सहानुभूती नाही. गरिबांना आपण काहीतरी आर्थिक मदत करायची असते हे माहीत असूनही ते गरिबांना मदत न करता त्यांची थट्टा करतात. रस्त्याच्या कडेला, सरकारी जागेत व पालात राहणारी माणसे अठरा विश्व दारिद्र्यात खितपत पडली आहेत. त्यांना एक वेळचे जेवण मिळणे मुश्किल झाले आहे. घर प्रपंच चालवणे, मुला बाळांचे शिक्षण, मुलींचे लग्न या सम स्या त्यांच्यासमोर आवासून उभ्या टाकल्या आहेत. या समस्यांनी व विचारांनी ते पुरते ग्रासून गेले आहेत. जगायचे की मरायचे? हा प्रश्न त्यांच्यापुढे नेटाने उभा टाकला आहे. यावरून असे कळते की, श्रीमंत लोक गरिबांना जराही मदत न करता, त्यांच्याप्रती सहानुभूती न दाखवता त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण करत आहेत. त्यांना नावे ठेवून त्यांची टिंगल टवाळी करत आहेत. परंतु माणुसकीच्या नात्याने त्यांना आर्थिक मदत करायची असते, त्यांना मानसिक आधार द्यायचा असतो हे विसरून गेले आहेत. ही लोकशाही प्रधान देशासाठी खूप मोठी धोक्याची घंटा आहे. आईवडील आपल्यासाठी फार मोठे वटवृक्ष असते. त्यांच्या छत्रछायेखाली आपण लहानाचे मोठे होतो. वटवृक्षाची सावली म्हणजे आई वडिलांची सावली आपल्याला खूप मोठा आधार देते. आपल्याला हाताला धरून चालायला शिकवते, आपल्याला बालवाडीत शिकायला घेऊन जाते, आपल्याला बाहेर फेरफटका मारायला घेऊन जाते. आपले सर्व हट्ट पुरवते व आपले लालन पालन सुद्धा करते आणि आपल्याला आयुष्याच्या भट्टीतून तावून-सुलाखून बाहेर काढते. एवढे उपकार आई वडील आपल्यावर करतात. आपल्या कातड्याचे जोडे जरी करून शिवले तरी आई-वडिलांचे उपकार कधीच फिटत नसतात. म्हणून आई-वडिलांना म्हातारपणात सांभाळणे व त्यांची देखभाल करणे हे आपले परम कर्तव्य असते. परंतु आजकालची मुले आई-वडिलांना बेईमान होत आहेत. त्यांच्या जीवावर मोठे होऊन त्यांना म्हातारपणात घराबाहेर काढत आहेत किंवा वृद्धाश्रमात पाठवत आहेत आणि आपण बायको लेकरांत मश्गुल होत आहेत. हीच या देशाची शोकांतिका आहे. एखाद्यावर अन्याय होत असेल तर अन्यायग्रस्त व्यक्तीच्या बाजूने जाऊन अन्याय करणाऱ्या व्यक्तीला धडा शिकवणे हे माणुसकीच्या नात्याने माणसाचे काम असते परंतु आजकाल माणूस अशा जागी माणुसकी दाखवत नाही. बघ्याची भूमिका घेते किंवा मोबाईल मध्ये फोटो काढून किंवा व्हिडिओ बनवून तो व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करते. श्रीमंतांच्या घरी कुत्रे जगवले जातात परंतु माणसाला किंमत नाही. दारावर आलेल्या अतिथीला चहापान करून काढून दिले जाते. परंतु आपुलकीने जेवण करा असे कोणीही म्हणत नाही. बसने प्रवास करताना असे लक्षात येते की, वृद्धांना व दिव्यांग व्यक्तींना तरुण मुले बसायला जागा देखील देत नाहीत. ते वृद्ध व दिव्यांग व्यक्ती बिचारे उभे टाकून जातात परंतु त्यांना बसा कोणी म्हणत नाही यावरून कळते की माणसातली माणुसकी समूळ नष्ट झाली आहे आणि माणूस रानटी जनावर झाला आहे. हैवानी रूप धारण करून हैवानासारखे जगत आहे. तेव्हा प्रश्न पडतो की, माणसातील अमानुषता कधी कमी होणार? माणूस माणसासारखे कधी वागणार? मुले आई-वडिलांना म्हातारपणात कधी साथ देणार? श्रीमंत माणसे गरिबांना आपल्या पंगतीला कधी आणणार?

याचा प्रत्येकाने विचार करून आत्मपरीक्षण करायला हवे.. ज्या दिवशी वरील प्रश्न सुटतील त्या दिवशी आपला देश आणखीन मजबूत व बलशाली झाल्याशिवाय राहणार नाही.. आणि सामाजिक समस्या सुटल्याशिवाय राहणार नाहीत.. म्हणून म ाणसातील अमानुषता कमी करा आणि माणसासारखे जीवन जगा हाच उद्देश या लेखाचा आहे...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## हजारो विद्यार्थ्यांनी केले' वंदे मातरम' चे गायन

**विशाल देशमुख टेंभूर्णी -** ज्ञानसागर विद्यालयाच्या प्रांगणात 'वंदे मातरम' गीताच्य १५० व्या वर्धापनदिनानिमित्त 'वंदे मातरम' सम ूह गायन कार्यक्रम घेण्यात आला. कानिफनाथ महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था जाफराबात (आयटीआय) यांच्या वतीने एक भव्य सामूहिक वंदे मातरम् गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांसह हजारो विद्यार्थ्यांनं वंदे मातरम् या गीताचे सामूहिक गायन केले कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार डॉ. सारिक भगत यांनी केले. यावेळी व्यासपीठावर गटविकास यशस्वितेसाठी गट निदेशक संजय जाधव, शिल्प अधिकारी नारायण खिल्लारे, गटशिक्षण अधिकार्ए निदेशक जानकीराम राठोड, सुनील नाईकवाडी प्रदीप शिंदे, पोलीस निरीक्षक सतीश जाधव, प्राचार रामप्रसाद टेकाळे, श्रीकिसन गायकवाड, विजय के. बी. ठाकूर, सुरेश दिवटे, अण्णासाहेब इंगळे फदाट, भाऊसाहेब वाकेकर, गजानन लांबे प्रल्हाद लोणकर, मुकेश भारद्वाज, समाधान फदाट अमोल गावंडे, अमोल दळवी, सचिन राऊत हनुमान जोशी, लता चव्हाण, वेदांत खैरे, शासकीय शिल्पनिदेशिका चित्रा पेंढारकर, चक्रवर्ती खिल्लारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. पांडुरंग गजानन गोफणे, सत्यकुमार राठी, विनायक लोखंडे राऊत यांनी, प्रास्ताविक गट निदेशक संजय जाधव यासह अनेकांची उपस्थिती होती. प्रमुख वत्ते यांनी केले. ज्ञानसागर विद्यालय, न्यू हायस्कूल, पी अॅड. रामेश्वर अंभोरे यांनी वंदे मातरम् गीताचे एम. श्री. जिल्हा परिषद प्रशाला, जिजाऊ इंग्लिश् महत्त्व सांगितले. पोलीस निरीक्षक सतीश जाधव स्कूल, समर्थ महाविद्यालय, जिल्हा परिषद उद यांनी या गीताचा इतिहास सांगितला. कार्यक्रमाच्य हायस्कूल, आयशा उर्दू हायस्कूल आदी शाळांची उपस्तिती होती.

# निसर्गाला अनुरूप जीवनशैलीची ताकद नैसर्गिक शेतीतच - संजय मोरे

### ग्रोव्हिजन गटशेती संघांचे वालसा येथे चर्चासत्र



**जालना । प्रतिनिधी -** आपली जीवनशैली ही निसर्गाला अनुरूप ठेवण्याची ताकद ही नैसर्गिक व पर्यावरणपुरक शेतीतच आहे. नैसर्गिक शेती ही शाश्वत शेती आहे असे मत ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी व्यक्त केले.

शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांची शेतकऱ्यांसाठी स्वयंप्रेरनेने चालविलेली संपुर्ण शेती चळवळ हे ब्रीद घेऊन चाललेल्या ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेस आयोजिण्यात येणारे नोव्हेंबर महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र रविवारी भोकरदन तालुक्यातील मौजे वालसा ( वडाळा ) येथे पार पडले. त्या प्रसंगी श्री. संजय मोरे पाटील बोलत होते. नैसर्गिक संसाधनाचा वापर करून जमिनीचे बिघडत चाललेले आरोग्य सुधारल्या जावू शकते. जल, जंगल आणि जमिनीचे आरोग्य वाचवू शकलो तर भविष्यातील पिढ्यासाठी दायित्व म्हणून आपण काही तरी देऊ शकू असेही संजय मोरे पाटील म्हणाले.

डॉ. गणेश पाटील पोटे हे गेल्या चार वर्षांपासून आपली दहा एकर शेती एसआरटी पद्धतीने करत आहेत. त्या शेतीतील कपाशी, तूर, मका या शेतीत यावेळी शिवारफेरी करण्यात आली. ही सर्व पिके पाहून उपस्थित शेतकरी समाधान पावले. उपस्थित शेतकऱ्यांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात आला. भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी अकोला ( देव ) चे श्री. सुधीर जोशी, पळसखेड ( पिंपळे )चे श्री. गणेशबापू पिंपळे, श्री. गजानन पिंपळे, श्री. एकनाथ पिंपळे, श्री. निवृत्ती पिंपळे, श्री. लक्ष्मण पिंपळे, कंडारी बु. चे श्री. ज्ञानेश्वर सिनगारे, पाडा ( आन्वा )चे श्री. विकास सोनोने, तपोवनचे श्री. रावसाहेब मालुसरे, मालखेडाचे श्री. सुभाष घोडके, बोरखेडी चिंचचे श्री. विष्णू लोखंडे, श्री. प्रकाश गुळवे, जैनपूर ( कोठारा )चे श्री. सुधाकर रोडे, श्री. गणेश साबळे, वडाळा ( वालसा )चे श्री. अशोक सोळंके यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

# कालच्या घटनांनंतर संदेश देण्यासाठी हीच सर्वोत्तम सकाळ आहे.- न्यायमूर्ती मेहता

**जालना । प्रतिनिधी -** बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा, १९६७ अंतर्गत आयसिस विचारसरणीला प्रोत्साहन देणे आणि दहशतवादी कारवाया करण्याच्या कटाचा भाग असल्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीला जामीन देण्यास सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नकार दिला. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने या निर्णयाद्वारे समाजाला एक कठोर संदेश दिला आहे, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष ड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केले आहे.

या निकालाचे स्वागत करताना ड. धन्नावत म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. देशाची सुरक्षा आणि अखंडतेच्या दृष्टीने असे कठोर पाऊल उचलणे आवश्यक होते. न्यायमूर्तींनी म्हटल्याप्रमाणे, 'समाजाला योग्य संदेश देण्याची हीच सर्वोत्तम सकाळ आहे', हे विधान देशाच्या न्यायव्यवस्थेची दहशतवादाविरुद्धची शून्य-सहिष्णुता भूमिका स्पष्ट करते. या निर्णयामुळे समाजात सकारात्मक संदेश जाईल आणि अशा देशविघातक कृत्यांमध्ये सामील होण्यापासून इतरांना परावृत्त करण्यास मदत होईल.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

याचिकाकर्त्यावर आयसिस या दहशतवादी संघटनेशी संबंध ठेवणे, फिसाबिलिल्लाह नावाचा व्हॉट्सप ग्रुप तयार करणे, ज्याचा डिस्प्ले पिक्चर आयसिसच्या ध्वजासारखा होता, आणि शस्त्रे मिळवण्यासाठी जबलपूर ऑर्डनन्स फॅक्टरीवर हल्ला करण्याचा कट रचल्याचा आरोप आहे. मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने ६ जानेवारी, २०२५ रोजी विशेष राष्ट्रीय तपास यंत्रणा न्यायालयाचा जामीन नाकारणारा आदेश कायम ठेवला होता, ज्याला याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

**सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण**

आज दिनांक ११/११/२०२५ मंगळवारच्या सुनावणीदरम्यान, याचिकाकर्त्याचे वकील, ज्येष्ठ अधिवक्ता सिद्धार्थ दवे यांनी दिल्लीतील नुकत्याच झालेल्या बॉम्बस्फोटाचा संदर्भ देत म्हटले की, कालच्या घटनांनंतर या केसवर युक्तिवाद करण्याची ही सर्वोत्तम सकाळ नाही. यावर न्यायमूर्ती मेहता यांनी उत्तर दिले, संदेश देण्यासाठी हीच सर्वोत्तम सकाळ आहे.

न्यायालयाने नमूद केले की, याचिकाकर्त्याकडून प्रक्षोभक साहित्य जप्त करण्यात आले होते आणि त्याच्याविरुद्ध प्रथमदर्शनी खटला सिद्ध झाला आहे. न्यायमूर्ती मेहता यांनी टिप्पणी केली, तुमच्यावर देशात दहशतीचे जाळे निर्माण केल्याचा आरोप आहे. न्यायमूर्ती नाथ यांनी पुढे जोडले, देशात अशांतता निर्माण करणे आणि नागरी जीवनावर परिणाम करणे, हा गंभीर गुन्हा आहे.

यूएपीए कायद्यांतर्गत तयारी करणे हा देखील एक गुन्हा आहे, असे खंडपीठाने स्पष्ट केले. याचिकाकर्ता ७०% दिव्यांग असून तो अडीच वर्षांपासून तुरुंगात असल्याची बाब मांडण्यात आली, परंतु न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला.

**खटला दोन वर्षांत पूर्ण करण्याचे निर्देश**

जामीन नाकारताना, न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या तुरुंगवासाचा कालावधी आणि खटल्याची सद्यस्थिती विचारात घेतली. ६४ पैकी १९ साक्षीदारांची तपासणी झाली असून, आरोपपत्रात एकूण ९४ साक्षीदारांचा उल्लेख आहे. न्यायालयाने ट्रायल कोर्टाला हा खटला दोन वर्षांच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जर याचिकाकर्त्याच्या चुकीशिवाय खटला दोन वर्षांत पूर्ण झाला नाही, तर त्याला पुन्हा जामिनासाठी अर्ज करण्याची मुभा असेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

# आरदखेडा येथे प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पाणलोट विकास घटक अंतर्गत क्षमता बांधणी उपजीविका प्रशिक्षण कार्यक्रम आरदखेडा येथे आयोजित करण्यात आला होता. उद्घाटन सरपंच शिवाजी भिसे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी समूह संघटक अजय कांबळे, संस्थेचे अध्यक्ष मुरली सुरासे, तसेच प्रशिक्षक गजानन उदावंत आणि प्रकाश बुधवंत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षणादरम्यान आरदखेडा येथील स्वयं-सहाय्यता बचत गटातील महिलांना शेतीपूरक व्यवसायांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, शेळीपालन, नर्सरी, मसाले उद्योग, पापड, लोणची, चटण्या आदी विविध उद्योगांबाबत गजानन उदावंत, प्रकाश बुधवंत, मुरली सुरासे आणि अजय कांबळे यांनी मार्गदर्शन केले. खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्र आणि यशस्वी आवळा उद्योजिका सीताबाई मोहिते यांच्या आवळा उद्योगाला भेट देण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांची मार्गदर्शन केले. अभ्यास सहल शेती व शेतकरी विकास बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. यावेळी महिलांनी विविध यशस्वी शेतीपूरक व्यवसायांना भेट देऊन अनुभव घेतला.

**झाडे लावा झाडे जगवा**

# सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव येथे मौलाना अब्दुल कलाम आझाद जयंती साजरी

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मानव विकास व पूर्ण निर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव येथे आज दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मौलाना अब्दुल कलाम आझाद भारताचे (पहिले शिक्षणमंत्री) यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त शाळेत शाळेत मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले या निमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जीवन परिचयावर सखोल प्रकाश टाकला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक सुनील वाकेकर साहेब तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमानिमित्त सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती लाभली.



# आशिया कपसाठी तिरंदाज तेजल साळवेची भारतीय संघात निवड



**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील अंकुशराव टोपे महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. तेजल साळवे हिची सौदी अरेबियातील जत्रा येथे होत असलेल्या आशिया कप तिरंदाजी स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

तेजलने साळवे हिने आंतरविद्यापिठीय क्रीडा स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना वैयक्तिक सुवर्णपदक पटकावून विद्यापीठास प्रथमच तिरंदाजी क्रीडा प्रकारात सुवर्णपदक मिळवून दिले. सदर स्पर्धा पंजाब राज्यातील भटिंडा येथे संपन्न झाली. या स्पर्धेत देशातील अनेक विद्यापीठातून खेळाडू सहभागी झाले होते. देशातील अनेक नामांकित विद्यापीठातील खेळाडूंवर मात करीत कु. तेजल राजेंद्र साळवे हिने वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले. तेजलने या स्पर्धेत दोन सुवर्णपदके आणि मिश्र दुहेरीत ब्रान्झ पदक मिळवून नेत्रदीपक कामगिरी केली. तेजलने आजपर्यंत विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून ४ पदके मिळविली असून राष्ट्रीय स्तरावर १७ पदके मिळवून या खेळात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. तेजलची धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेतील कामगीरी लक्षात घेऊनच तिची आशिया कपसाठी स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड करण्यात आली आहे.

तेजल साळवे हिने आंतरविद्यापीठीय तिरंदाजी स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल तसेच तिची भारतीय संघात निवड झाल्याबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. राजेशभैय्या टोपे, सचिव मनिषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सहप्रशासकीय अधिकारी श्री. राहुल भालेकर, प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य संजय पाटील, उपप्राचार्य पांडुरंग खोजे, क्रीडाविभाग प्रमुख डॉ. भुजंग डावकर, प्रा. चंद्रकांत लाटेकर, प्रा.राम प्रसाद भालेकर, डॉ. रानमाळ, डॉ. गावंडे, डॉ. करवंदे, डॉ. निकाळजे, डॉ देवरे, डॉ. वैद्य, डॉ. सांगुळे, डॉ. ढेरे, डॉ. जाधव, डॉ. अन्सारी, अधीक्षक सुरेश चव्हाण, डॉ. शंकर तिकांडे यांनी सत्कार करून तिचे अभिनंदन केले.

# जिल्हा युनायटेड ग्लोबलर फेडरेशन तर्फे बॅग वाटप

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** परिषद शाळा वरखेडा फिरंगी जाफराबाद जालना येथे युनायटेड ग्लोबल फेडरेशन यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात शाळेतील इयत्ता १ ते ५ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय बॅगा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी आणि शिक्षकवर्गाने उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले त्यानंतर युनायटेड ग्लोबल फेडरेशन चे चेअरमन मॅनेजिंग डायरेक्टर दुर्गेश विष्णू बनकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देणे हीच संस्थेची सामाजिक जबाबदारी आहे.

बॅग मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान झळकत होते. काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत संस्थेचे आभार मानले.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी संस्थेच्या कार्याचे मनापासून कौतुक करत सांगितले की, अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची उर्मी वाढते आणि शिक्षणाबद्दलची ओढ टिकून राहते. कार्यक्रमात गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालकवर्ग तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

समारोपाच्या वेळी सर्व उपस्थितांनी शिक्षण हाच सर्वोत्तम दान या भावनेने अशा उपक्रमांना पुढे चालू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरखेडा (विरो) येथे शालेय व्यवस्थापन समितीची निवड



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरखेडा विरों.येथे शाळा व्यवस्थापन समिती निवड करण्यात आली. निवड करताना खेळीमेळीच्या वातावरणात शाळा व्यवस्थापन समिती .अध्यक्ष, व सदस्यांची, निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी श्री. मधुकर भीमराव खरात. यांची निवड करण्यात आली .व तसेच उपाध्यक्ष लिलाबाई प्रल्हाद उबाळे यांची निवड करण्यात आली .सदस्य. वंदना विष्णू धायडे .वर्षा सुनील उबाळे . प्रदीप बाबुराव राऊत. दीपक पांडुरंग राऊत. शामराव तुकाराम राऊत .हे शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य निवडण्यात आलेआहे तरी त्यांची गावकऱ्यातर्फे व पालकातर्फे सत्कार करण्यात आला. दासू पाटील उबाळे, शंकर पाटील उबाळे. रामेश्वर पाटील उबाळे. गोटू पाटील उबाळे, भगवान पाटील उबाळे, शाळेतर्फे मुख्याध्यापक .के यु बकाल यांनी सत्कार केला उपस्थित श्रीमती शिक्षिका के बी सहाने यांनी आभार मानले.



# संस्कार प्रबोधिनी शाळेतील विद्यार्थ्यांची श्रीराम वाचनालयास क्षेत्र भेट




**जालना । प्रतिनिधी -** येथील संस्कार प्रबोधिनी शाळेच्या इयत्ता दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांनी श्रीराम वाचनालयाला आज भेट दिली. याप्रसंगी ग्रंथालयाचे ग्रंथपाल शाम शेलगावकर यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगत ग्रंथालयाबद्दल माहिती दिली. संस्कृत शिक्षक संजय हेबारे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी संस्कार प्रबोधिनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बाल साहित्य पुस्तकांचा संच भेट दिला. विद्यार्थ्यांनी गोष्टीच्या पुस्तकातील गोष्टी वाचून त्याचे सादरीकरण केले. शाळेतील शिक्षिकांचे स्वागत ग्रंथ भेट देऊन शाम शेलगावकर यांनी केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षिका वैशाली वाघमारे, सविता राठोड, माया बोरगावकर, रोहिणी कन्हाळे, सोनाली परभणीकर, वर्षा देशमुख, कीर्ती पुराणिक, वाचनालयाचे सहायक ग्रंथपाल शैलेंद्र बदनापूरकर, प्रतिमेश शेलगावकर यांची उपस्थिती होती.

परतुर येथे सीसीआय च्या कापूस खरेदी केंद्राचे सभापती राहुल लोणीकर यांच्या हस्ते उदघाटन

# सीसीआय केंद्राच्या माध्यमातून, खरेदीसाठी शेतकऱ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या

## भाजपा प्रदेश सचिव तथा सभापती राहुल लोणीकर यांचे प्रतिपादन

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथे आज अक्षय कोटेक्स जिनिंग फॅक्टरीमध्ये सीसीआय च्या हमी भाव कापूस खरेदी केंद्राचे उद्धाटन भाजपा प्रदेश सचिव तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राहुल लोणीकर यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले.

यावेळी प्रथम पाच शेतकऱ्यांनी आणलेल्या कपाशीच्या गाड्यांचे पूजन करून मानाच्या शेतकऱ्यांना फेटा बांधून राहुल लोणीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

यावेळी कापसाला ८०६० रुपये प्रति क्विंटल असा हमीभाव देण्यात आलेला असून यावेळी बोलताना भा ज पा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की, यार्डात कापूस घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय होता कामा नये, जेणेकरून शेतकरी आपला कापूस सीसीआयच्या हमीभाव केंद्रावर भिंत कंपनी आणिल शेतकऱ्यांना याबाबतीत कुठलीही अडचण आल्यास कृषी उत्पन्न बाजार समिती सह थेट माझ्याशी संपर्क करावा

पुढे बोलताना ते म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्यामुळे शेतकऱ्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय खपवून घेतला जाणार नाही असेही त्यांनी या वेळी बोलताना सांगितले

यावेळी प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यासह उपसभापती संभाजी वारे दिनेश होलानी पद्माकर कवडे सत्यनारायण अग्रवाल, नितीन जोगदंड माऊली तनपुरे प्रशांत बोनगे विजय वाणी, युवा अक्षय कोटेक्स चे संचालक दिलीप नहार, अक्षय नहार सीसीआयची श्री सोनवणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे




आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शत्रुघ्न कणसे, उपसभापती रवींद्र सोळंके, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले संचालक पाराजी मुळे मोर्चा तालुकाध्यक्ष संभाजी घनवट सनी तनपुरे गजानन लिपणे सुधाकर बेरगुडे, बाळासाहेब ढवळे पिंटू काका ढवळे, माधव सिंग जनकवार, सचिव श्री रामकिसन लिपने श्री डोंगरे, श्री मुजिक बेग श्री कादे यांच्या सह मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# १७ नोव्हेंबरला महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याच्या चौथ्या सोमवारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. तरी सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतीमध्ये महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जालना येथे दाखल करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी केले आहे.

अर्ज स्वीकृतीसाठी तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावी, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही. महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनांत अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लवकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करुन या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असेही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी वाहतुकीस अडथळा ठरणारा पोल सुरक्षितपणे बाजूला केला

**जालना । प्रतिनिधी -** घनसावंगी येथून जालनाकडे येत असताना गाडे सावरगाव जवळ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांना रस्त्यावर इलेक्ट्रिक पोल धोकादायक स्थितीत रस्त्यावर आडवा झालेला दिसून आला. या रस्त्यावरून प्रामुख्याने दुचाकी वाहनांची वाहतूक होत असते. एखादा दुचाकीस्वार अथवा वाहनधारकाचा पोलला धडकून अपघात घडू नये म्हणून जालनाचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल आणि वाहनचालक संतोष थोरात यांनी स्वतः स्थानिकांची मदत घेऊन तो पोल उचलून सुरक्षितपणे उचलून बाजूला केला. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी वाहतुकीच्या रस्त्यावर लोखंडी पोल अथवा फलक वाहतुकीस अडथळा किंवा धोका निर्माण करु शकतील, अशा स्थितीत दिसून आल्यास तात्काळ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, पोलीस किंवा सार्वजनिक बांधकाम विभागास त्वरित संपर्क साधून कळवावे. प्रशासनाची मदत घेऊन किंवा स्थानिकांची मदत घेऊन ते तात्काळ रस्त्यावरून बाजूला करून घ्यावे आणि अपघात टाळण्यास मदत करावी.

# महापालिका, नगर परिषद व नगर पंचायती क्षेत्रात 'कर मुल्यांकनासाठी' विशेष मोहीम राबविणार - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद, नगर पंचायती तसेच जालना महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कर व इतर स्थानिक करांचे उत्पन्न वाढविण्यासाठी 'कर मुल्यांकन' बाबत विशेष मोहीम राबविण्याबाबतचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात नगर प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त, सह आयुक्त व जिल्हातील सर्व नगर परिषद मुख्याधिकारी यांच्या आढावा बैठकीत सदरील निर्देश देण्यात आले. या मोहिमेद्वारे जालना शहर महानगरपालिका क्षेत्रातील, तसेच जिल्हातील सर्व नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील प्रत्येक घर, व्यावसायिक आस्थापना मधील बांधकामांचे सर्वेक्षण करून करनिर्धारण अद्ययावत केले जाणार आहे. या उपक्रमाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा उद्देश आहे.याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी थकीत कर वसुली भरुन प्रशासनास सहकार्य करावे जेणेकरून आपणास महानगरपालिका, नगर परिषद व नगर पंचायत कडून अधिकाधिक उत्तमरित्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास मदत होईल. या बैठकीत घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, प्रधानमंत्री आवास योजना शहरी, पी. एम. विश्वकर्मा,पी.एम.स्व निधी, दिन दयाळ अंत्योदय योजना, उप जिविका अभियानाविषयी आढावा घेण्यात आला. प्रत्येक नगर परिषद कार्यक्षेत्रात प्लास्टिक प्रोसेसिंग सेंटर उभारण्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी निर्देश दिले.

# 'अमृत' महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेने ऐतिहासिक कामगिरी करत विश्वविक्रमी झेप

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेने ऐतिहासिक कामगिरी करत विश्वविक्रमी झेप घेतली आहे. 'अमृत' मार्फ़त या दिवाळीत ''अमृत दुर्गोत्सव २०२५' हा एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, संस्कृती रक्षण, स्वभाषा, स्वधर्म यासारख्या अनेक गुणांना उजाळा देऊन अनेकांच्या मनावर सुसंस्कार करणे, या दृष्टीने समाजमन घडविणे आणि शिवाजी महाराजांना विश्वविक्रमी मानवंदना देणे हा होता. यासाठी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष असलेले आणि युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केलेल्या बारा दुर्गांपैकी कोणत्याही एकाची प्रतिकृती अंगणात, सोसायटी, शाळेत, मैदानात तयार करून त्यासोबत फोटो घेऊन तो ''अमृत दुर्गोत्सव २०२५' च्या वेबसाईटवर अपलोड करायचा होता. सहभागी होणाऱ्या प्रत्येकास माननीय मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र मिळणार होते.

अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांचे उत्तम नियोजन आणि अमृत कर्मचाऱ्यांच्या प्रचंड मेहनतीच्या जोरावर हा केवळ शासकीय उपक्रम न राहता त्याला लोकोत्सवाचे रूप प्राप्त झाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, शेजारील राज्ये, इतकेच काय अमेरिका, इंग्लंड, आखाती देशातून मिळालेला भावनिक प्रतिसाद याद्वारे ''अमृत दुर्गोत्सवात' प्रचंड प्रमाणात दुर्गांसोबत घेतलेले फोटो जमा झाले. ही संख्या इतकी प्रचंड होती की या गोष्टीची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' या विश्वविक्रमांची नोंदणी करणाऱ्या जगातील सर्वात प्रतिष्ठित संस्थेने घेतली.

'मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम' या श्रेणीमध्ये 'अमृत दुर्गोत्सवात' विश्वविक्रम झाल्याचे प्रमाणपत्र गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' चे वर्ल्डवेळलरींी प्रतिनिधी श्री. प्रवीण पटेल यांच्या हस्ते अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना सुपूर्द केले.

यावेळी बोलताना 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड ' चे अधिकृत पंच श्री प्रवीण पटेल यांनी सदर विश्वविक्रमाची कठीण तपासणी प्रक्रिया सर्वांपुढे मांडली. सुयोग्य चित्रे निवडणे, अस्पष्ट व दुबार चित्रांना बाद करणे आदी अनेक दिवस चाललेल्या अतिशय क्लिष्ट प्रक्रियेतून जाऊन विश्वविक्रम प्रस्थापित होऊ शकला याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. दिनांक १० नोव्हेंबर २०२५ म्हणजेच शिवप्रताप दिनाचे औचित्य साधून 'अमृत मुख्यालयात' एका भव्य कार्यक्रमात 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'चे अधिकृत प्रमाणपत्र श्री. विजय जोशी यांना सुपूर्द करण्यात आले. या विश्वविक्रमात सहकार्य करणारे सर्व शासकीय अधिकारी, सामाजिक नेतृत्व, दुर्गप्रेमी, विद्यार्थी, सर्व शिवप्रेमी, अमृत कर्मचारी यांचे विजय जोशी यांनी आभार मानले आहेत. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जुन्या पदवीधर विद्यार्थ्यांसाठी पदवी प्रमाणपत्राचा विलंब शुल्क/दंड माफ

## पदवीधरांनी लाभ घ्यावा - प्रा. अमर शेख

**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी -** डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत ज्या पदवीधरांनी शिक्षण घेतलेले आहे परंतु अद्याप स्वतःचे पदवीचे प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा विद्यार्थ्यांना मूळ फीस व्यतिरिक्त पहिल्या वर्षी १०० आणि त्यानंतर प्रत्येक वर्षी पन्नास रुपये दंड आकारण्यात येतो असे अनेक जुने पदवीधर बांधव आहेत त्यांना शेकडो,हजारो रुपयांचा विलंब शुल्क किंवा दंड त्यांच्या पदवी प्रमाणपत्रासाठी लागत आहे,त्याच दंड माफीसाठी मी गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने प्रयत्नशील आहे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या अनेक आजी- माजी सदस्य डॉ. शिवाजी मदन,डॉ. नरेंद्र काळे,डॉ.राजेश करपे,डॉ.गणेश शेटकर,डॉ.प्रा.आप्पासाहेब हुंबे, सिनेट सदस्य प्रा.बंडू सोमवंशी यांच्याशी सातत्याने विलंब शुल्क किंवा दंड माफ व्हावा यासाठी आग्रही होतो, त्याचेच फलित व्यवस्थापन परिषदेच्या परवाच्या बैठकीत दंड माफीचा निर्णय झाला, यासाठी विद्यापीठ स्तरावर प्रयत्न करणाऱ्या सर्वांचेच आभार,या अगोदर ही आपण २०१३, २०१७-१८ ला दंड माफी करून घेतली होती,त्यावेळी आ. संदीप भैय्या क्षीरसागर आणि मराजी आ. राहुल भैय्या मोटे यांच्या वाढदिवसानिमित्त मी घरपोच पदवी प्रमाणपत्र पदवीधर आमदार सतीश भाऊ चव्हाण यांच्या हस्ते राबविले होते, आत्ताही मी पदवीधरांना फक्त विद्यापीठाच्या मूळ शुल्कात घरपोच पदवी प्रमाणपत्र मिळवून देणार आहे,त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जावून त्या पदवीधरांचे पदवी प्रमाणपत्रासाठी फॉर्म भरून घेत, विद्यापीठात जमा करणार, यामुळे त्या पदवीधरांचा येण्या जाण्याचा शेकडो,हजारो रुपये खर्च आणि वेळ मी वाचविणार आहे,अधिक माहितीसाठी ९४०५१०१०३४ या क्रमांकावर संपर्क साधावा आणि पदवीधर विद्यार्थ्यांनी यासंधीचे सोने करावे असे आवाहनही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी एस.पी. पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.अमर शेख यांनी केले आहे.



# शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** केंद्र पुरस्कृत योजना अन्न व पोषण सुरक्षा अभियान कडधान्य व तृणधान्य सन २०२५-२६ अंतर्गत प्रमाणित बियाणे वितरण बाबीमध्ये जिल्ह्यास लक्षांक प्राप्त आहे. उद्देश पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी व बियाणे बदलाचे महत्व विचारात घेता सुधारित, संकरीत वाणांचे प्रसाराच्या दृष्टीने प्रमाणित बियाणे वितरणाचा कार्यक्रम राबविणे. हरभरा पिकासाठी १० वर्षाआतील ९५० क्विंटल तसेच १० वर्षावरील बियाणे २४७२.१ क्विंटल प्रमाणित बियाणे वितरणाचा जिल्ह्यास लक्षांक प्राप्त असून १० वर्षाआतील रु ५००० क्विंटल व १० वर्षावरील बियाण्यास रु. २५०० क्विंटल अनुदान देय आहे. तसेच ज्वारी पिकाच्या १० वर्षातील २७० क्विंटल तसेच १० वर्षावरील बियाणे ७०० क्विंटल प्रमाणित बियाणे वितरणाचा जिल्ह्यास लक्षांक प्राप्त असून १० वर्षा आतील रु. ३००० क्विंटल व १० वर्षावरील बियाण्यास रु. १५०० क्विंटल प्रमाणित बियाणे वितरण या घटकांतर्गत आर्थिक सहाय्य प्रति शेतकरी कमाल एक हेक्टरपर्यंत मर्यादित आहे. शेतकऱ्यास महाबिज, राष्ट्रीय बीज निगम, कृभको आदि बियाणे पुरवठादार संस्थेच्या वितरकामार्फत सातबारा उताऱ्याच्या आधारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (ऋउऋड) तत्त्वावर प्रमाणित बियाणे वितरण संबंधित संस्थांनी करावे, या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# जालना-नांदेड जिल्ह्यातील शेतक-यांच्या समृध्दी महामार्गाच्या समस्यांबाबत आढावा बैठक संपन्न

## रस्ते विकास महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक मिश्रा यांची उपस्थिती

**जालना । प्रतिनिधी -** जालना-नांदेड प्रकल्पात भुसंपादीत होणा-या जमीनीच्या मुल्यांकनाबाबत व प्राप्त शेतक-यांच्या तक्रारीबाबत शेतक-यांशी आज दि ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक -२ लक्ष्मीनारायण मिश्रा यांनी आढावा बैठक घेऊन उपस्थित अधिकाऱ्यांना सुचना दिल्या.

सदरील बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रशासक तथा उपजिल्हाधिकारी प्रशांत शेळके, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे,उप जिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार छाया पवार, जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय गहिनीनाथ कापसे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख एम. पी. मगर, सहाय्यक संचालक नगर रचना सुमित मोराळकर यांच्या सह अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मौजपुरी, धांडेगाव, राममूर्ती, राम नगर, नसडगाव,देवमूर्ती,पानशेंद्रा यासह अन्य गावातील समृध्दी बाधित शेतकऱ्यांनी आपल्या समस्या व अडचणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा यांना सांगितल्या. सदरील शेतकऱ्यांच्या समस्या व अडचणी तात्काळ निकाली काढण्याबाबत उपस्थित अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा यांनी निर्देश दिले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282.
अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.